www.sgbauonline.com

**AU–2053**

# B.A. (Part-I) (Semester-II) Examination

## (Modern Indian Languages)

## MARATHI (Compulsory)

वेळ—तीन तास] [एकूण गुण—80

**सूचना :—** बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करतांना गृहित धरली जातील.

1. 'भयावह अशा ज्या ज्या गोष्टी असतील त्यांना तोंड द्या—ठामपणे तोंड द्या' या स्वामी विवेकानंदाच्या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

शिवरायांच्या प्रजाहितदक्ष राज्यकारभाराची वैशिष्ट्ये 'स्त्री शूद्रांचा राजा छत्रपती शिवराय' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा. 16

2. ऋतुराज वसंताचे हृदयंगम वर्णन 'वसंतवेणा' या ललित निबंधाच्या आधारे लिहा.

**किंवा**

'अल्पभूधारक' कथेचा आशय स्पष्ट करा. 16

3. (अ) स्त्रीची अस्मिता व त्यासाठी तिला करावी लागणारी बंडखोरी संत जनाबाईच्या अभंगातून कशी व्यक्त झाली आहे. सविस्तर लिहा.

**किंवा**

'तयास मानव म्हणावे का ?' या कवितेचा आशय स्पष्ट करा. 8

(ब) 'माय'ची महती व तिच्या हालअपेष्टांना कवी स.ग. पाचपोळ यांनी कसे अधोरेखित केले आहे. स्पष्ट करा.

**किंवा**

कृषिवल संस्कृतीसंबंधीचा अनुभव 'गेले तुटून पंख' या कवितेत कसा व्यक्त झाला आहे. तुमच्या शब्दात लिहा. 8



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

4. (अ) कार्यालयीन पत्रव्यवहाराची रचना व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

किंवा

पंजाब काळे आदर्श कॉलनी, अकोला यांची मोटार सायकल चोरीस गेल्याबद्दल पोलिस स्टेशन, अकोला यांचेकडे तक्रार नोंदवणारे पत्र तयार करा. 8

(ब) स्व-परिचयपत्र तयार करतांना कोण-कोणत्या गोष्टीची काळजी घेणे गरजेचे असते ते स्पष्ट करा.

किंवा

कु. मंगला वैद्य हिला स्टेट बँक ऑफ ईंडिया मध्ये नोकरीसाठी अर्ज करायचा आहे. त्यासाठी तिचे परिचयपत्र तयार करा. 8

5. खालील बहुपर्यायी प्रश्न सोडवा : 16

(1) स्वामी विवेकानंदांच्या मते जगाचा इतिहास कोणी घडविला ?

(अ) देवांनी (ब) दानवांनी

(क) मानसांनी (ड) स्वत:वर श्रद्धा-असणाऱ्यांनी

(2) 'हा तुमचा दोष नाही. तुमच्या शिक्षण पद्धतीचा आहे' हे उद्‌गार कोणाचे आहे ?

(अ) साने गुरुजी (ब) जयंत नारळीकर

(क) महात्मा फुले (ड) र.धो. कर्वे

(3) औरंगजेबाने लावलेल्या कोणत्या कराला शिवाजी राजांनी विरोध केला होता ?

(अ) शेतसारा (ब) जिझिया

(क) महसूलकर (ड) यात्राकर

(4) सर्व शक्तीने युक्त असा कोण असतो ?

(अ) हत्ती (ब) राक्षस

(क) मानव (ड) परमेश्वर

(5) चिंतामण कोणत्या गावास राहायला जातो ?

(अ) वडगाव (ब) आडगाव

(क) सावरगाव (ड) लालखेड



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(6) थंडी पळवून जेणारा ऋतुराज कोणास म्हटले आहे ?

(अ) हेमंत (ब) वसंत

(क) शरद (ड) वर्षा

(7) भागवत धर्माचे पहिले संघटक म्हणून कोणत्या संतास ओळखतात ?

(अ) संत ज्ञानेश्वर (ब) संत एकनाथ

(क) संत नामदेव (ड) संत रामदास

(8) संत नामदेवांच्या कुटुंबाबरोबर पंढरपूरास राहावयास कोण आले होते ?

(अ) संत सोयराबाई (ब) संत कान्होपात्रा

(क) संत जनाबाई (ड) संत मिराबाई

(9) 'तयास मानव म्हणावे का ?' ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेतली आहे ?

(अ) काव्यफुले (ब) अग्नीफुले

(क) रानफुले (ड) झेंडुचीफुले

(10) 'जन विषयाचे किडे' यांची धाव बाह्याकडे' कवितेच्या या ओळी कोणाच्या आहेत ?

(अ) ग्रेस (ब) बालकवी

(क) बी (ड) कुसुमाग्रज

(11) 'गेले तुटून पंख' या कवितेतून कोणत्या संस्कृती संबंधीचा विचार व्यक्त केला आहे ?

(अ) नाग संस्कृती (ब) कृषी संस्कृती

(क) ऋणी संस्कृती (ड) देव संस्कृती

(12) 'मला उद्ध्वस्त व्हायचय' हे आत्मकथन कोणाचे आहे ?

(अ) शंकरराव खरात (ब) दया पवार

(क) नामदेव ढसाळ (ड) मलिका अमरशेख



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(13) स.ग. पाचपोळ यांनी लिहिलेल्या कवितेच नाव काय ?

(अ) योद्धा (ब) माय

(क) चाफा (ड) आई

(14) राज्यभिषेकाचा खर्च शिवाजी राजांनी कोणावर कर लावून भरून काढला ?

(अ) शेतकरी (ब) सैनिक

(क) वतनदार (ड) व्यापारी

(15) दिवसभराची उन्हे पिऊन रात्रंदिवस ताजीत वाणी कोण दिसतात ?

(अ) पानं (ब) फुलं

(क) फळं (ड) झाडं

(16) कवी 'बी' यांचा जन्म विदर्भातील कोणत्या गावी झाला ?

(अ) नागपूर (ब) चंद्रपूर

(क) मलकापूर (ड) यवतमाळ



www.sgbauonline.com